# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम /फार्मसी अ.फेरी/२०१८/९९४

दिनांक : - 3 AUG 2018

विषय: औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या शासकीय,शासन अनुदानीत संस्थां, विद्यापीठ संचालित महाविद्यालये/विभाग यामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेशासाठी अतिरिक्त प्रवेश फेरीबाबत.....

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांच्या अनुषंगाने शासनाने असाधारण राजपत्र क्रमांक २००,२०१,२०२ अन्वये अनुक्रमे पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पदवी अभ्यासक्रमांचे सुधारीत प्रवेश नियम दिनांक ५.६.२०१८ रोजी प्रसिध्द केले आहेत. यापूर्वी दिनांक २४.४.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या असाधारण राजपत्र क्रमांक १०३,१०५ व १०४ (अनुक्रमे पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पदवी) प्रवेश नियमावली हे मुख्य नियम असून दिनांक ५.६.२०१८ रोजी निर्गमित केलेले प्रवेश नियम हे त्यास पूरक / सुधारीत नियम असल्याचे शासनाने स्पष्ट केलेले आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फे-यांनंतर रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरण्याची नियमामध्ये तरतूद आहे. राज्यातील शासकीय, शासन अनुदानीत संस्थां, विद्यापीठ संचालित महाविद्यालये / विभाग यामध्ये रिक्त राहिलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या हितार्थ एकत्रितपणे आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत अतिरिक्त प्रवेश फेरी आयोजित करून त्यामार्फत करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.३८१(ब)/तांशि-४, दिनांक २१.७.२०१६ अन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तीन प्रवेश फे-या पूर्ण झालेल्या आहेत. दरम्यानच्या काळात मा. उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ नागपूर येथे औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाच्या एका संस्थेने रिट याचिका दाखल केलेली होती सदरील याचिकेच्या निकालामध्ये मा. उच्च न्यायालयाने " ज्या औषधनिर्माणशास्त्र संस्था प्रवेश प्रक्रियेच्या सर्व फेऱ्यामध्ये समाविष्ट होत्या त्या सर्व संस्थाना अतिरिक्त फेरीमध्ये भाग घेण्याची परवानगी देण्यात यावी" अशा आशयाचे आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अनुषंगाने अतिरिक्त फेरीसाठी आवश्यक प्रक्रिया खालील प्रमाणे असेल.

१. ज्या विनानुदानित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थाना या प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा आहे अशा औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या Login मधून अतिरिक्त फेरीमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी व

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून त्यांचेकडे परत करण्यात आलेल्या जागा पुन्हा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित करण्यासाठी स्वीकृती देणे आवश्यक आहे

२. अर्ज करणाऱ्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी तिसरी फेरी झाल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून त्यांचेकडे परत करण्यात आलेल्या जागाच्या बदल्यात जर संस्था स्तरावर प्रवेश दिलेले असतील तर त्याची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर online पद्धतीने Update करणे आवश्यक आहे.

३. संस्थेने Online पध्दतीने अतिरिक्त फेरीमध्ये समाविष्ट होण्यासाठी स्वीकृती दिल्यानंतर त्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून शिल्लक राहिलेल्या रिक्त जागा आपोआप अतिरिक्त फेरीसाठी घेण्यात येतील. त्यानंतर संस्थाना त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल कोणत्याही सबबीखाली करता येणार नाही. व संस्थेस अशा जागा संस्थास्तरावर भरता येणार नाहीत.

या प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.

१. अतिरिक्त फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी संस्थांनी , संस्थेच्या Login मधून स्वीकृती देणे व संस्थांनी संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करणे -

दि. ०४.०८.१८ ते ०६.०८.२०१८ दुपारी ४.०० वाजेपर्यंत

या प्रवेश फेरीसंबंधी महत्वाच्या सूचना वेगळ्या परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या असून सर्व संस्थांनी त्याचेसुद्धा अवलोकन करावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : राज्यातील औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी